नि.दि.मु.क्र. १०९/२०१५ मधील नि.५ वरील आदेश

(मुस्लीम जमात जामा मस्जीद वि. अरुण घाडगे व.)

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे

२. अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

अर्ज कलम १ मध्ये नमूद केलेला पूर्वेकडील वालचंदनगर इंडस्ट्रीज रस्त्याचे पश्चिमेस सि.स.नं. १६३१ च्या उत्तर व सि.स.नं. १०७ च्या दक्षिणेपासून पुढे मशिदीकडे जाणारा बोळाचा रस्ता आहे. वादीची नोंदणीकृत संस्था असून त्याचे प्रवेशद्वार पूर्वेकडे आहे. त्यामुळे दावा मिळकत म्हणून वर्णन केलेल्या बोळाचा वापर मुस्लिम समाजातील लोक व वादी दैनंदिन प्रार्थनेसाठी, धार्मिक कार्यासाठी व इतर कारणांसाठी अनेक वर्षांपासून विनाहरकत करत आहेत. प्रतिवादींनी सि.स.नं. १६३१ च्या उत्तरेस लागून असलेल्या १७ X १६ फुट क्षेत्रात अनाधिकाराने बांधकाम करण्याच्या हेतूने खड्डे खोदण्यास सुरुवात केली. त्यामुळे वादी व मुस्लिम समाजातील लोकांना वर नमूद दावा बोळातून येण्याजाण्याच्या वापरास बाधा निर्माण झाली आहे. करिता त्यांनी प्रस्तुत दावा दाखल करुन प्रतिवादींनी सि.स.नं. १६३१ मध्ये सुरु केलेले बांधकाम थांबवण्यासाठी व वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातूर्त हुकूमाची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी नं.१ तर्फे या अर्जाला म्हणणे (नि.४७) दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, वाद बोळ मिळकत कोणाच्या मालकीची आहे, त्याचा कच्चा नकाशा, त्यांचे योग्य वर्णन वादीने दिलेले नाही. वालचंदनगर इंडस्ट्रीजकडे जाणारा रस्ता कंपनीचा खाजगी रस्ता आहे. प्रतिवादींनी सुरु केलेले बांधकाम वाद बोळामध्ये नाही. प्रतिवादींनी त्यांच्या मालकी वहिवाटीच्या सि.स.न. १६३१ मधील जुनी बांधीव इमारत जीर्ण झाल्याने ती पाडून

त्याच ठिकाणी पूर्वीच्या मोजमापाइतके आर.सी.सी. इमारत बांधण्यासाठी खड्डा खोदून कॉलम उभे करुन कॉंक्रिटमध्ये भरुन घेतले आहे

४. सि.स.नं. १६३१ या मिळकतीत सन १९५४ च्या सुमारास प्रतिवादींचे आजोबा शंकर तुकाराम घाडगे यांनी चार खणाची इमारत बांधून त्यामध्ये सलून व्यवसाय सुरु केला. प्रतिवादींचे आजोबा मयत झाल्यानंतर प्रतिवादींचे वडिल हा व्यवसाय पुढे चालवू लागले. सन १९८० मध्ये सयाजीराव केशवराव फाळके व शंकरराव श्रीपतराव फाळके यांनी सि.स.नं. १६३१ मधील सलून दुकान काढून घ ेण्यासाठी प्रतिवादींच्या वडिलांना सांगितले. त्यामुळे प्रतिवादींच्या आईने प्रतिवादी व त्यांच्या भावांच्या वतीने अ.पा.क. म्हणून दि. १९/०१/१९८० रोजी सदरची मिळकत खुषखरेदी घेतली. परंतु, खरेदी देणार यांचे या मिळकतीच्या ७/१२ उता—याला नाव नसल्याने, प्रतिवादी व त्यांच्या बंधूंचे नाव इतर हक्कामध्ये दाखल केले. या मिळकतीमधील दक्षिणेकडील काही भाग सन १९८५ साली शिलाई व्यवसायासाठी इसाक रशीद मोमीन यांना दिले. सन १९८७ साली रशीद हासीन मोमीन यांना चार खणापैकी काही भाग चहा टपरीसाठी विकत दिला. उर्वरित मिळकतीमध्ये प्रतिवादींचा सलून व्यवसाय सुरु होता.

५. सन १९९७ मध्ये सिटी सर्व्हे योजना लागू झाल्यानंतर या मिळकतीला सि.स.नं. १६३१ पडला. सन २००९ साली बासीद अब्दुल कादर यांनी सदर मिळकत त्यांच्या आईची वारसा हक्काची असल्याचे प्रतिवादींना सांगितले. प्रतिवादींच्या इतर बंधूंनी ही मिळकत खरेदी घेण्यासाठी अनिच्छा दाखवली. प्रतिवादी नं.१ ने दि. २०/०२/२०१० रोजी बासिद अब्दुल कादर यांच्याकडून ही मिळकत खरेदी घेतली. त्याप्रमाणे सि.स.नं. १६३१ या मिळकतीला प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद असून ती मालकी हक्काने या प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीस आहे. प्रतिवादी नं.१ ने अतिक्रमण करुन वाद बोळ रस्त्यामध्ये बांधकाम सुरु केलेले नाही. तथाकथित बोळ रस्ता वापरण्याचा वादीला अधिकार नाही. हा अर्ज व दावा दाखल केल्यामुळे

प्रतिवादी नं.१ ला सलून व्यवसाय बंद ठेवावा लागला आहे व त्यांचे बांधकाम देखिल अपूर्ण राहिले आहे. त्यामुळे हा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी नं.१ चे नुकसान होणार असल्याने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. वादी व प्रतिवादींतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रे पाहिली. खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्या समोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

	मुद्दे	**निष्कर्ष**
१	वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे काय?	होय
२	न्यायाचा झुकता तराजु वादीच्या बाजुने आहे काय ?	होय
३	अर्ज नामंजुर केल्यास वादीला अपरिमित हानी होईल काय?	होय
४	आदेश काय ?	अर्ज मंजुर.

<u>कारणमीमांसा</u>

७. याकामी वादी व प्रतिवादींतर्फे विविध दस्तऐवज दाखल केले आहेत.

८. **<u>मुद्दा क्रमांक १ साठी :—</u>**

प्रतिवादी नं.१ च्या म्हणण्याप्रमाणे, त्यांनी वाद मिळकत दि. १९/०१/१९८० रोजी प्रतिवादी व त्यांचे भाउ आत्माराम व अनिल या तिघांकरिता अ.पा.क. म्हणून खरेदी केली होती. प्रतिवादी नं.१ तर्फे नि. ६३/५ खाली दि. १९/०१/१९८० चे खरेदीपत्र व नि.६३/१ खाली तात्कालिन ३४२/क/२अ या मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्या खरेदीपत्रावरुन असे आढळते की, दि. १९/०१/१९८० रोजी या मिळकतीमधील अर्धा गुंठा क्षेत्र प्रतिवादी नं.१

च्या आईने प्रतिवादी नं.१ व त्यांच्या भावांकरिता खरेदी घेतला आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ व त्यांच्या भावांची इतर हक्कात नोंद झाली आहे.

९. त्यानंतर प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, या मिळकतीवर सन २००९ साली बासिद अब्दुल कादर यांनी हक्क दाखवून ही मिळकत त्यांच्या आईला वारसा हक्काने मिळाल्याचे सांगितले. त्यावेळी प्रतिवादींनी जुने दस्तऐवज पाहिले असता पूर्वीचे खरेदी देणार फाळके व जाधव यांची ही मिळकत नसल्याचे आढळले. म्हणून त्यांनी बासिद यांच्याकडून दि. २०/०२/२०१० रोजी स.नं. ३६२/२अ/१ क्षेत्र पाउण गुंठे ही मिळकत खरेदी घेतली. प्रतिवादी नं.१ तर्फे नि. ६३/१ खाली सि.स.नं. ३६२/२अ/१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यामध्ये प्रतिवादी नं.१ ची फेरफार नं. ३०९७ ने नोंद झाली आहे. वादीतर्फे नि. ३/३ खाली दि. २२/०२/२०१० चे प्रतिवादी नं.१ च्या नावचे खरेदीपत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच नि.७ खाली गट नं. ३६२/२अ/१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यामुळे या नोंदीवरुन दि. २२/०२/२०१० च्या खरेदीपत्रापासून प्रतिवादी नं.१ सि.स.नं. १६३१ च्या कब्जेवहिवाटीस असल्याचे प्रथमदर्शनी आढळते.

१०. वादीतर्फे वकिलांनी प्रतिवादी नं.१ च्या सि.स.नं. १६३१ च्या मालकीबद्दल युक्तिवादामध्ये बरेच आक्षेप उपस्थित केले. प्रस्तुतचा दावा केवळ निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता त्यामध्ये सि.स.नं. १६३१ ची मालकी ठरवण्याची आवश्यकता नाही. तसेच सि.स.नं. १६३१ ही मिळकत दावा मिळकत नाही. त्याचप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज विचारात घेताना देखिल सि.स.नं. १६३१ मध्ये प्रतिवादींना मालकी आहे का हे पहाण्याची आवश्यकता नाही. याउलट वादीने स्वत: वाद बोळ रस्त्याचा उल्लेख करताना त्याच्या दक्षिणेस रशिद हसन मोमीन व घाडगे यांची सि.स.नं. १६३१ ही मिळकत लिहिलेले आहे. म्हणजेच वादीने सि.स.नं. १६३१ मधील प्रतिवादी नं.१ ची

कब्जेवहिवाट नाकारलेली नाही.

११. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या आजोबांपासून सि.स.नं. १६३१ वर त्यांची कब्जेवहिवाट आहे. प्रतिवादी नं.१ तर्फे नि.६३/२ ते ४ खाली ग्रा.मि.नं. ८५८, १०७० व ६२४ चा उतारा दाखल केला आहे. नि.६३/३ खालील उतारा सन १९५८—५९ सालचा प्रतिवादी नं.१ च्या आजोबांच्या नावचा आहे. त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की, त्यातील फक्त शेड शंकर तुकाराम घाडगे यांच्या मालकीचे व जागा दुस—याची आहे. त्याचप्रमाणे उल्लेख नि.६३/४ व ५ मधील सन १९६७—६८ व १९९८—९९ च्या ग्रामपंचायत उता—यांमध्ये आढळतो. म्हणजेच सुरुवातीपासून या मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.१ च्या पूर्वहक्कदारांपासून केवळ शेड मालकीचे असून तद्नंतर नि.३/३ वरील खरेदीपत्राप्रमाणे दि. २२/०२/२०१० रोजी ही मिळकत खरेदी केली आहे.

१२. वादीतर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये प्रतिवादी नं.१ ने पाउण गुंठे, पाव गुंठा अथवा अर्धा गुंठा जमिन खरेदी केली याबद्दल संदिग्धता असल्याचे सांगितले. प्रतिवादी नं.१ ने त्यांच्या म्हणण्यामध्ये सि.स.नं. १६३१ मधील पाउण गुंठा क्षेत्रामध्ये त्यांच्या आजोबांनी चार खणाची इमारत बांधल्याचे लिहिले आहे. दि. १९/०१/१९८० च्या खरेदीपत्राने तात्कालिन सि.स.नं. ३४२क/२अ पैकी अर्धा आर क्षेत्र त्यांच्या आईने प्रतिवादींच्या वतीने अ.पा.क. म्हणून खरेदी केले. दि. २२/०२/२०१० च्या खरेदीपत्राने पाउण गुंठा क्षेत्र प्रतिवादी नं.१ ने खरेदी केल्याचे लिहिले आहे. सदरच्या क्षेत्राचा उल्लेख वादीने दाखल केलेल्या दस्तऐवजांमध्ये आढळतो. नि.७ खालील ७/१२ उता—यामध्ये हे क्षेत्र ०। ० या चिन्हाने दर्शवले आहे व त्याचा अर्थ पाव गुंठा क्षेत्र असल्याचे सांगितले. या अनुषंगाने नि.३/३ खालील खरेदीपत्र पाहिले असता त्यामध्ये ०। ० या चिन्हाला कंसामध्ये पाउण गुंठा इतके क्षेत्र लिहिले आहे. त्यामुळे नि.७ वरील ७/१२ उता—यात दाखवलेले चिन्ह हे पाव गुंठा नसून पाउण गुंठयासाठी असल्याचे खरेदीपत्रावरुन प्रथमदर्शनी दिसते.

मुळात प्रतिवादी नं.१ चे सि.स.नं. १६३१ मध्ये किती क्षेत्र आहे हादेखिल वादविषय नाही. केवळ प्रतिवादी नं.१ ने वाद बोळ रस्त्यामध्ये अतिक्रमण करुन बांधकाम सुरु केले आहे का ते पहाणे गरजेचे आहे.

१३. याशिवाय वादीतर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये दि. २३/०१/१९८७ रोजी प्रतिवादी नं.१ च्या आईला या मिळकतीमधील १ खण दुपाकी शेडसह मिळकत रशिद हसन मोमीन यांना विकण्याचा अधिकार नव्हता असे म्हटले आहे. प्रतिवादी नं.१ तर्फे नि.६३/६ खाली दि. २३/०१/१९८७ चे खरेदीपत्र दाखल केले आहे. हा खरेदी व्यवहार रशिद हसन मोमीन व अरविंद नामदेव घाडगे, आत्माराम नामदेव घाडगे, अनिल नामदेव घाडगे, नं.२ व ३ तर्फे अ. पा.क. द्रौपदा नामदेव घाडगे यांच्यामध्ये झाले आहे. या खरेदीपत्राला वादी पक्षकार नाही. त्यामुळे संविदाजन्य हितसंबंधाच्या तत्वानुसार या टप्प्याला दि. २३/०१/१९८७ चे खरेदीपत्र करुन देण्याचा प्रतिवादी नं.१ च्या आईला अधिकार आहे अथवा नाही याबद्दल वादीला आक्षेप घेता येणार नाही.

१४. याशिवाय प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वादी ही नोंदणीकृत संस्था आहे, तसेच वादी सरफराज शफी सय्यद हे वादी संस्थेचे सदस्य आहेत हे दाखवण्याकरिता कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. त्यामुळे हा दावा चालू शकत नाही. वादीतर्फे नि.३/२ खाली दि. २६/०६/२०१५ च्या जनरल मिटिंगची नक्कल दाखल केली आहे. त्याप्रमाणे वादी मस्जिद संस्थेमार्फत हा दावा दाखल करण्यासाठी सरफराज शफी सय्यद यांना या संस्थेचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले आहे. त्यामुळे हा दावा चालवण्यासाठी सरफराज शफी सय्यद यांना अधिकार दिल्याचे स्पष्ट होते. वादी संस्था नोंदणीकृत आहे असे दाखवण्यासाठी नि. ३/२ खालील नक्कलेवर त्यांचा मूळ शिक्का उमटवलेला आहे. नि.१ मध्ये देखिल त्यांचा नोंदणी क्र. एन.एस.बी. — ७३ लिहिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ तर्फे उपस्थित केलेली हरकत टिकू शकत नाही.

१५. प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी पुढे असा युक्तिवाद केला की, यामध्ये दावा मिळकतीचे अचूक वर्णन दिलेले नाही, दाव्यासोबत कच्चा नकाशा दाखल केलेला नाही, त्यामुळे दावा मिळकतीची ओळख होत नाही. तसेच यामध्ये नमूद केलेला बोळ रस्ता वापरण्याचा वादीला अधिकार आहे हे दाखवण्यासाठी वादीने कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही. वादीला या वाद बोळ रस्त्याव्यतिरिक्त पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. वादीने दाव्यामध्ये सुविधाधिकार मागितलेला नाही अथवा त्या अनुषंगाने कथने केलेली नाहीत. त्यामुळे वादीची मागणी विचारात घेता येणार नाही.

१६. वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी वाद रस्त्यावरील अधिकार सुविधाधिकार म्हणून मागितला नसून पायाभूत अधिकार म्हणून मागितला आहे. त्यामुळे या अनुषंगाने कथन दाव्यामध्ये लिहिलेले नाही. तसेच वादी मशिदीकरिता केवळ एक रस्ता आवश्यक नसून पूर्वापार अस्तित्वात असलेला बोळरस्ता मुस्लिम समाजाच्या प्रार्थनेसाठी, धार्मिक कार्यासाठी व मयत व्यक्तींच्या अंत्ययात्रेसाठी आवश्यक आहे. वादीतर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने ***इब्राहिमकुट्टी कोयाकुट्टी वि. अब्दुल राहूमानकुंजू इब्राहिमकुट्टी व इतर*** प्रकाशित ***ए आय आर १९९३ केरला ९१*** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, सुविधाधिकाराचे कथन स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. सदरचा न्यायनिर्णय याकामी गैरलागू आहे कारण वादीने कथनामध्ये वाद बोळ रस्त्यावर सुविधाधिकार सांगितला नसून त्यांचा अधिकार सांगितला आहे. तसेच वाद बोळ रस्ता हा प्रतिवादी नं.१ च्या मालकीचा नाही. त्यामुळे याकामी सुविधाधिकाराची कथने वादीने केलेली नाहीत.

१७. वादीतर्फे नि.३/१ खाली उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी दिलेले पत्र दाखल केले आहे. या पत्राने वादीला सि.स.नं. १६४२ ते १६४६ च्या मिळकत

पत्रिकेचा उतारा या मिळकतींची सनद तयार नसल्यामुळे पुरवता येत नाही असे कळवले आहे. त्यामुळे वादीतर्फे नि.१० खाली उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी दिलेला नकाशा दाखल केला आहे. निश्चितच या नकाशाचे अवलोकनावरुन वादी मशिदीच्या पश्चिमेकडून उत्तरेकडील रस्त्यावर येण्यासाठी अन्य रस्ता उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. या व्यतिरिक्त दाव्यात नमूद केलेला बोळ पूर्वेकडील वालचंदनगर इंडस्ट्रीजच्या पश्चिमेस सि.स.नं. १६३१ च्या उत्तरेपासून अस्तित्वात असल्याचे आढळते. त्यामुळे या बोळातील रस्त्यामध्ये प्रतिवादी नं.१ ने अतिक्रमण करुन बांधकाम सुरु केले आहे का एवढेच पहाणे आवश्यक आहे.

१८. याकामी प्रतिवादींतर्फे नि.४४ खाली न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणुकीसाठी अर्ज दाखल केला होता. त्या अर्जाप्रमाणे नगरभूमापन अधिका—यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. न्यायालयीन आयुक्तांनी नि. ७२ खाली त्यांचा पूर्वीचा अहवाल नकाशासह व त्यानंतर नि.८३ खाली दुरुस्त अहवाल दाखल केला आहे. या अहवालावर उभय पक्षकारांचे म्हणणे मागवले. प्रतिवादीतर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नि.८३ व ७२ मधील नकाशामध्ये तफावत असल्याचे सांगितले व त्यावरील नकाशाप्रमाणे प्रतिवादी नं.१ ने उत्तरेकडे अतिक्रमण केल्याचे दाखवले व पश्चिमेकडील बोळामध्ये अतिक्रमण केल्याचे दाखवले नाही. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांनी दाखल केलेला नकाशा वाद कथनांच्या विपरित असल्याने त्यावरुन प्रतिवादी नं.१ ने वाद बोळ रस्त्यामध्ये अतिक्रमण केले नाही असा युक्तिवाद केला.

१९. याउलट वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, नि.८३ व ७२ मधील नकाशामध्ये प्रतिवादी नं.१ ने बोळ रस्त्यामध्ये अतिक्रमण केल्याचे पिवळया व लाल रंगाने दर्शवले आहे. सदरचे क्षेत्र दोन्ही नकाशांमध्ये १.५० चौ.मी. आहे. यावरुन प्रतिवादी नं.१ ने बांधकाम करताना सि.स.नं. १६३१ च्या बाहेर जावून १.५० चौ.मी. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याचे स्पष्ट होते.

२०. वादीने अर्जामध्ये सि.स.नं. १६३१ च्या उत्तरेकडे अथवा पश्चिमेकडे प्रतिवादीने अतिक्रमण करुन बांधकामास सुरुवात केली असे लिहिलेले नाही. वादीने केवळ असे लिहिले आहे की, सि.स.नं. १६३१ च्या उत्तरेस लागून असलेल्या १७ X १६ फुट लांबी रुंदीच्या क्षेत्रात प्रतिवादी नं.१ ने अनाधिकाराने इमारत बांधण्याच्या हेतूने पायाचे खड्डे खोदण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या कथनावरुन नि.८३ व ७२ खालील न्यायालयीन आयुक्तांनी दिलेला नकाशा व अहवाल एकमेकांविपरित आहे असे आढळत नाही. याउलट या अहवालावरुन सि.स.नं. १६३१ च्या क्षेत्राबाहेर जावून प्रतिवादी नं.१ ने बांधकाम सुरु केल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

२१. नि.३/७ खाली दि. २२/०२/२०१० च्या खरेदीपत्रामध्ये चतु:सिमेत उत्तरेस मशिदीला जाण्या येण्याकरिता लिहून घेणार यांनी २ फुट रस्ता सोडण्याचा आहे असे लिहिले आहे. त्याप्रमाणे प्रतिवादीने बांधकामास सुरुवात करताना उत्तरेस २ फुट जागा सोडली आहे असे नि.७२ वरील नकाशावरुन प्रथमदर्शनी दिसत नाही. प्रतिवादी नं.१ तर्फे याकामी त्यांच्या पूर्वीच्या बांधकामाचे मोजमाप व सध्या सुरु असलेल्या बांधकामाच्या मोजमापाचे कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाहीत. या बांधकामास ग्रामपंचायतीने मंजूरी दिली व त्या मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम सुरु आहे असे दाखवणारा देखिल दस्तऐवज नाही. प्रतिवादी नं.१ ने केवळ असे नमूद केले आहे की, जुनी बांधीव इमारत जीर्ण झाल्याने त्याच ठिकाणी पूर्वीच्याच मोजमापाइतकी आर.सी.सी. इमारत बांधण्यासाठी खड्डे खोदून कॉलम उभे करुन क्रॉंक्रिट भरुन घेतले आहे. परंतु, या अनुषंगाने प्रतिवादी नं.१ तर्फे दस्तऐवज दाखल केला नाही.

२२. प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, दि. २२/०२/२०१० च्या खरेदीपत्राला वादी स्वत: हजर होता. त्यामुळे या खरेदीपत्राची

त्याला माहिती आहे व याच्या मालकीबद्दल तो आक्षेप घेवू शकत नाही. नि.३/१ खालील खरेदीपत्राच्या प्रतीमध्ये वादी हा साक्षीदार असल्याचे आढळते. प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूमासाठी असल्याने प्रतिवादी नं.१ च्या सि.स.नं. १६३१ च्या मालकीबद्दल यामध्ये विवेचन करण्याची आवश्यकता नाही. केवळ वादी हा दि. २२/०२/२०१० च्या खरेदीपत्राला साक्षीदार होता म्हणून तो प्रतिवादी नं.१ विरुध्द दावा दाखल करु शकत नाही हा युक्तिवाद समर्थनीय नाही.

२३. याउलट वादीतर्फे दाखल केलेल्या दस्तऐवजांवरुन सि.स.नं. १६३१ मध्ये १.५० चौ.मी. या अधिकच्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी नं.१ ने बांधकाम केल्याचे प्रथमदर्शनी आढळते. प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वादीला हा दावा दाखल करण्याचा अधिकार नाही कारण प्रतिवादी नं.१ ने केलेले बांधकाम वादीच्या मालकीच्या मिळकतीमध्ये नाही व वादी जनहितामध्ये हा दावा दाखल करु शकत नाही. वादीने अर्जात केलेली कथने पाहता, सि.स.नं. १६४२ मध्ये असलेल्या मस्जिदीसाठी येण्या जाण्याकरिता दावा कलम १ मध्ये नमूद केलेला बोळ अस्तित्वात आहे असे प्रथमदर्शनी नि.१० वरील नकाशावरुन आढळते. केवळ या मशिदीसाठी अन्य पर्यायी रस्ता उपलब्ध आहे म्हणून प्रतिवादी नं.१ ने सुरु केलेले बांधकाम तसेच चालू ठेवणे अयोग्य आहे. निश्चितच मशिदीच्या ठिकाणी येणा—या मुस्लिम बांधवांची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी मुस्लिम समुदायाला धार्मिक कार्याला मोठया संख्येने यावे लागते. अशा परिस्थितीत केवळ या मशिदीच्या पश्चिमेकडून असलेला रस्ता पुरेसा नाही. त्याकरिता वाद बोळ रस्ता देखिल आवश्यक आहे. वादीने दाखल दस्तऐवजांवरुन त्याची प्रथमदर्शनी केस शाबित केल्याने मी मुद्दा क.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवते.

२४. **<u>मुद्दा क.२ व ३ साठी</u>** :—

सि.स.नं. १६३१ मध्ये प्रतिवादी नं.१ ने बांधकाम सुरु केल्याने व सदरचे बांधकाम हे वाद बोळ रस्तावर येत असल्याने वाद बोळ रस्त्याच्या उपभोगास

वादीला तसेच इतर नागरिकांना अडथळा निर्माण होत आहे. या अनुषंगाने वादीतर्फे नि.३/८ खाली छायाचित्र दाखल केले आहेत. या छायाचित्रावरुन वाद बोळ रस्त्याची प्रतिवादी नं.१ च्या बांधकामामुळे रुंदी कमी झाल्याचे देखिल प्रथमदर्शनी दिसते.

२५. वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, या बांधकामाच्या खड्डयामध्ये वादीच्या मुलाला अपघात होवून त्याच्या पायाला इजा झाली आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी नं.१ विरुध्द कोरेगाव पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवला आहे. याची प्रत वादीतर्फे नि.७५/१ खाली दाखल केली आहे. त्यातील मजकूराप्रमाणे दि. ०७/१२/२०१५ रोजी वादीचा मुलगा सैफ सरफराज सय्यद हा दुकानातून घरी येत असताना प्रतिवादी नं.१ ने रस्त्यामध्ये काढून ठेवलेल्या खड्डयात त्याचा पाय घसरुन तो पडल्याने त्याच्या पायाला दुखापत झाली आहे. नि.३/८ वरील छायाचित्रावरुन प्रतिवादी नं.१ ने सुरु केलेल्या बांधकामाचे स्वरुप दिसते. त्या ठिकाणी खड्डे खोदले असून पिलर काढून त्यामध्ये कॉंक्रिट भरले आहे व हे खड्डे अदयापी उघडे असून त्यामुळे वाद बोळ रस्त्याने ये जा करताना नागरिकांना धोका उद्‌भवू शकतो. तसेच या बांधकामामुळे सि.स.नं. १६४२ मधील मस्जिदीच्या वहिवाटीसाठी देखिल अडथळा होवू शकतो. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ने सुरु केलेले बांधकाम रोखणे आवश्यक आहे.

२६. प्रतिवादी नं.१ ने असे नमूद केले आहे की, हा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी नं.१ ला त्याचा व्यवसाय तात्पुरता बंद करावा लागत आहे. तसेच बांधकामाचे कॉलम उभे करुन ते कॉंक्रिट भरुन घेतल्याने बांधकाम साहित्य मोठी रक्कम खर्च करुन प्रतिवादीने जमवले आहे व त्याची नासधूस होण्याची शक्यता आहे. निश्चितच प्रतिवादी नं.१ हा त्याच्या आजोबांपासून सि.स.नं. १६३१ मध्ये सलून व्यवसाय करत असल्याचे प्रथमदर्शनी दाखल दस्तऐवजांवरुन आढळते. परंतु, प्रतिवादी नं.१ ने सध्या सुरु केलेले बांधकाम पूर्वीच्याच बांधकामाच्या जागेवर आहे

असे आढळलेले नाही. त्यामुळे सदरचे बांधकाम पूर्ण करण्याची प्रतिवादी नं.१ ला परवानगी देणे अनुचीत आहे. याउलट सदर बांधकामामुळे सि.स.नं. १६४२ च्या मस्जिदीच्या वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे न्यायाचा झुकता तराजू वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादी नं.१ चे बांधकाम पूर्ण झाल्यास वादीला व मोठया जनसंख्येला अपरिमित नुकसान होवू शकते. म्हणून मी मुद्दा क्र.२ व ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालील आदेश पारित करते :—

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी नं.१ ने दावा कलम १ मध्ये नमूद केलेले बांधकाम दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयापर्यंत करु नये अशी त्यांना तात्पुरती ताकिद देण्यात येते.

२. प्रतिवादी नं.१ ने वादीला वाद बोळ रस्त्याच्या कब्जेवहिवाटीस दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयापर्यंत हरकत अडथळा करु नये अशी त्यांना तात्पुरती ताकिद देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च मूळ न्यायनिर्णयावर अवलंबून राहिल.

कोरेगांव {श्र.म. हिंगसे}
दिनांक २२/०४/२०१६ सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कोरेगांव